# बौद्धिक संपदा हक्क : एक अभ्यास

प्रा. डॉ. अनिल बोपचे
मराठी विभाग प्रमुख
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय,
कोंढा- कोसरा,ता. पवनी, जि. भंडारा
मो. 942341114
ईमेल:- dranilbopche2010@gmail. com

==========================================================================

**सारांश:-**

बौद्धिक संपदा हक्क ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. या हक्क अंतर्गत मालकास व कार्याची निर्मिती करणाऱ्या व्यक्तीस त्याच्या नवनिर्मित कार्याचे हक्क सहजरित्या मिळते. या अधिकारामुळे कोणालाही निर्मात्याच्या संमतीशिवाय त्याने निर्मिती केलेल्या साहित्याचा वापर करता येत नाही. याचाच अर्थ हा की, नवीन शोध करणाऱ्या व्यक्तीने एका निर्मिती करणाऱ्या व्यक्तीच्या संमतीशिवाय अपहार किंवा त्याचा वापर करण्याच्या विरुद्ध बौद्धिक संपदा हक्कानुसार अधिकार प्राप्त करून देते. आजच्या घडीला प्रत्येक देशाने बौद्धिक संपदा हक्क (*Intellectual Property Rights)* हा कायदा संमत करून घेतलेला आहे. किंबहुना आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा 'विश्व बौद्धिक संपदा संघटना'कार्यरत आहे. या संघटनेने औद्योगिक आराखडा, मानवी प्रयत्नांच्या सर्व क्षेत्रांत शोध घेणे, साहित्यिक, कलात्मक व शास्त्रीय कार्य, शास्त्रीय शोध, औद्योगिक, शास्त्रीय, साहित्यिक, कलात्मक क्षेत्रातील हक्क, व्यापार चिन्ह, सेवेंचे चिन्ह, व्यापारी नाव व हुद्दा इ. चा बौद्धिक संपदा हक्कात समावेश केला आहे.

**बीज शब्द :-** संपदा, कायदा, अधिकार, बौद्धिक, उद्योग, कॉपीराईट, संमती, औद्योगिक.

**प्रस्तावना :-**

बुद्धिमत्ता हीसुद्धा संपत्ती होऊ शकते. आपल्या संपत्तीचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य ठरते. आपल्या संपत्तीचा कोणीही आपल्या संमतीशिवाय वापर करू शकणार नाही ही सर्वांची इच्छा असते. आजच्या या संगणक युगात कोणीही कोणाच्या बौद्धिकसंपत्तीवर आळा घालणार नाही, या अनुषंगाने 'बौद्धिक संपदा हक्क' या कायद्याची निर्मिती करण्यात आली. याचेच पर्यावसान पेटंट, कॉपीराईट या सारख्या शब्दांतून या कायद्याची महत्ती कळली. आजचे युग हे प्रगतीचे शिखर गाठणारे युग आहे. अशा या प्रगत युगात माहिती, डेटा, प्रगत ज्ञान इत्यादींचे महत्त्व वाढलेले आहे. सामाजिक व आर्थिक विकासासाठी बौद्धिक क्षमतेत वाढ करणे गरजेचे असते. या मानवाच्या बौद्धिक क्षमतेच्या माध्यमातून संशोधन, तंत्रज्ञान, साहित्य इ. क्षेत्रांत 'बौद्धिक संपदा हक्क' ही संकल्पना प्रकर्षाने पुढे आली, या संकल्पनेमुळे सर्वत्र सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले. नव्या संशोधनांना सुरक्षिततेचे कवच मिळाले. संशोधकांना प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे साहजिकच आर्थिक विकासाला सहजरित्या गती मिळाली. बौद्धिक संपदा

हक्कामुळे बौध्दिक मालमत्तेला सुरक्षितता मिळाली. या हक्कामुळेच संशोधनाच्या क्षेत्रात, नवनवीन शोधाच्या क्षेत्रात भरभराट झाली.

**बौद्धिक संपदा हक्काचे महत्त्व :**

बौद्धिक संपदा हक्क हे शोधकर्त्यांचे हित जपते. त्यांना स्वामीत्वाचे अधिकार मिळवून देते. त्यांच्या अधिकारांवर प्रहार करीत नाही तर उलट त्यांचे हित जपते. त्यामुळे या क्षेत्रातील प्रगती दिवसेंदिवस प्रगत होत चाललेली आहे. बौद्धिक संपदा हक्क हे आजच्या प्रगतीशील काळातील महत्त्वाची बाब बनलेली आहे. " आजच्या गतिमान युगात, बौद्धिक संपदा वाढत आहे. वैज्ञानिक प्रगती, उद्योजकता आणि नवकल्पना, सर्जनशीलतेच्या दृष्टीने भारतात झपाट्याने झालेल्या प्रगतीचा प्रकाश लक्षणीय आहे. या परिस्थितीत बौद्धिक संपदा किंवा स्वामित्व हक्काचे प्रभावी संरक्षण आणि व्यवस्थापनाला महत्त्व प्राप्त झाले आहे आणि भारत यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. "[१] आजचे युग हे गतिमान युग असल्यामुळे ज्ञान प्रसारण, ज्ञाननिर्मिती यांचा वापर जग आर्थिक फायद्यासाठी करत आहे. अशा या प्रगत जगात बौद्धिक संपदा हक्कांना अनन्यसाधारण महत्त्व आलेले आहे. पेटंट, कॉपीराईट्स, मूल्यमापन ग्रेड, जाहिराती, प्रकाशने, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय रँकींग या बाबींना या आधुनिक युगात महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. "बौद्धिक संपदा अधिकार हा औद्योगिक आणि साहित्य - कला विषयक मानवी मनाच्या निर्मितीवरील विविध अधिकारांचा समुच्चय आहे. त्यात ट्रेड मार्क, पेटंट, औद्योगिक डिझाईन इत्यादी अनेक वेगवेगळया अधिकारांचा समावेश आहे. या अधिकारामुळे निर्मात्याला आपल्या निर्मितीवर स्वामित्व तर मिळतेच, शिवाय त्याला योग्य ते मानधन, मेहनताना वा आर्थिक लाभही मिळू शकतो. "[२] बौद्धिक संपदा अधिकारामुळे आर्थिक व्यवस्था सुदृढ होऊन त्यात वृद्धी होते.

आजच्या घडीला बौद्धिक संपदांना फार महत्त्व आले आहे. व्यापार व उद्योग हे ज्ञानाधिष्ठित होत चाललेली आहेत. हे जग स्पर्धेचे जग आहे. या स्पर्धेच्या जगात टिकायचं असेल तर बौद्धिक संपदेवर भर देणे गरजेचे आहे. "समाजात सर्वच पातळयांवर बौद्धिक संपदा अधिकाराचे फायदे लक्षात येऊ लागले. अशा अधिकारांमुळे शोधकर्त्याला त्याच्या बुद्धी, वेळ व पैसा याची भरपाई व आर्थिक लाभ मिळू लागला. गुंतवणूकदारांना पारंपरिक मालमत्तेपेक्षा गुंतवणुकीसाठी वेगळे दालन खुले झाले. कंपन्याना उद्योग व व्यापाराच्या मक्तेदारीची संधी मिळाली. समाजाला शोधांमुळे नवनवीन वस्तू, सेवा, उपकरणे मिळून संपन्नता प्राप्त झाली व देशांना जगात अधिक उत्पन्न मिळण्याची शक्यता निर्माण झाली. "[३] परंतु काही देशांना या गोष्टी शक्य झाल्या नाहीत. याचेच पर्यावसान शोधांची नक्कल व चोरी व्हायला लागली. म्हणून कायद्याने अशा बाबींवर वचक ठेवण्यासाठी बौद्धिक संपदा हक्क अस्तित्वात आणले. "भारतात हळद, बासमती, कडुलिंब यांचे पेटंटस् विदेशी कंपन्यानी घेतल्याचे समजल्याने सजगता वाढली. "[४] अशा प्रकरणांमुळे आपसूकच या कायद्याबद्दल लोकांमध्ये जिज्ञासा निर्माण झाली.

**बौद्धिक संपदा हक्काची वैशिष्ट्ये:-**

१) बौद्धिक संपदाची निर्मिती बौद्धिकतेने केली जाते.

२) या हक्काची महत्त्वपूर्ण मालमत्ता म्हणून गणना केली जाते.

३) या हक्काची तत्परतेने अंमलबजावणी करता येते.
४) प्रतिलिपी अधिकार व पेटंट हे या अधिकाराची महत्त्वाची बाजू आहेत.
५) निर्मिती करणाऱ्यास तसेच मालकास हे अधिकार लाभ मिळवून देतात.
६) व्यापार किंवा व्यवसाय व्यवहारामध्ये बौद्धिक संपदा अधिकार मुख्य आधार ठरतात.
७) कायद्याने संमत केल्यामुळे या अधिकारांना कायदेशीर मान्यता प्राप्त झालेली असते.

## बौद्धिक संपदा हक्काच्या संरक्षणासाठी संमत करण्यात आलेले कायदे :-

### १) स्वामित्व हक्क किंवा पेटंट किंवा विशिष्ट मालकी हक्क -

या हक्काला साधारणतः पेटंट (Patent) या इंग्रजी शब्दाने ओळखले जाते. सरकारने शोध लावणाऱ्या व्यक्तीस ठराविक काळासाठी त्याने लावलेल्या शोधाबद्दल जे कायदेशीर अधिकार दिलेले असतात, त्यास पेटंट असे म्हटले जाते. या माध्यमातून शोधकर्त्यास विशिष्ट मालकी हक्क दिले जाते. शोध लावणाऱ्या व्यक्तीस त्याच्या कार्यवाहीबद्दल, शोधाबद्दल, त्याच्या मिश्रणाबाबत, शोधून काढण्याबाबत, त्याच्या नवीन प्रगती, विकासाबाबत अधिकृत प्रमाणाशिवाय उपयोग करण्यापासून संरक्षण मिळण्याचे सर्व हक्क या पेटंटच्या माध्यमातून दिले जाते. पेटंटचा अधिकार अर्ज केल्यापासून वीस वर्षे मुदतीपर्यंत दिलेलं असते. दिलेल्या मुदतीची मर्यादा संपल्यानंतर त्या शोधाचा कोणालाही उपयोग करता येऊ शकतो.

### २) प्रतिलिपी हक्क किंवा कॉपीराईट -

कॉपीराईट किंवा प्रतिलिपी हक्क हा बौद्धिक संपदेचा महत्त्वपूर्ण हक्क आहे. नाट्यकृती, साहित्यकृती, संगीत यांच्या मूळ अधिकारपत्रांना सरंक्षण देण्याचे कार्य या हक्काद्वारे केले जाते. मूळात हा हक्क म्हणजे ज्यांनी कार्य केले त्याला श्रेय देणे, त्याचे अधिकार सुरक्षित ठेवणे इ. बाबींवर कटाक्ष टाकणारा आहे. या हक्कात सिनेमा, नाटक, खेळ प्रदर्शित करणे, वेगवेगळया प्रकारचे संगीत, गीते, हस्तलिखित, पुस्तके, छायाचित्र, चित्रकला यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

ज्यावेळी एखादा वाद निर्माण होतो त्यावेळी प्रतिलिपी हक्काचे नोंदणीकृत प्रमाणपत्र (सर्टिफिकेट ऑफ कॉपीराईट रजिस्ट्रेशन) आणि त्याची केलेली नोंद हे प्रथमदर्शी पुरावा म्हणून त्याची दखल घेतली जाते.

प्रतिलिपी कायदा किंवा कॉपीराईट निर्मित करणाऱ्या व्यक्तीस त्याच्या हयातीपर्यंत अधिक साठ वर्षे या कायद्याचे संरक्षण सुरळितपणे घेता येते. या कायद्यानुसार प्रतिलिपीच्या मालकाची संमती घेणे अपरिहार्य असते; असे न केल्यास उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागते.

### ३) ट्रेड मार्क किंवा व्यापार चिन्ह -

विभिन्न चिन्ह किंवा विशिष्ट प्रतीक दर्शविणाऱ्या चिन्हांच्या माध्यमातून ट्रेड मार्क किंवा व्यापार चिन्ह दर्शविले जाते. ट्रेड मार्क a आणि A® अशा चिन्हांनी दर्शवितात. ट्रेड मार्क हे काही विशिष्ट वर्गाच्या वस्तू किंवा सेवेच्या बाबतीत व्यक्त केले जातात. या ट्रेड मार्कच्या माध्यमातून व्यापाऱ्याची उत्पादित वस्तू विभिन्न असल्याचे

दर्शविले जाते. ट्रेड मार्क किंवा व्यापार चिन्हाचा इतरांनी उल्लंघन केल्यास व्यापार चिन्हाचा मालक त्यांच्या विरोधात कोर्टात दाद मागू शकतो.

निष्कर्ष:-

बौद्धिक संपदा अधिकार हा निर्मिती करणाऱ्यांना प्रोत्साहन देतो. किंबहुना त्यांच्या निर्मिती प्रक्रियेला चालना देतो. या हक्कामुळे लेखकांना तसेच इतरांना एकप्रकारचे संरक्षण मिळाले आहे. या अधिकारामुळे कोणाच्याही संशोधनावर आळा घालता येत नाही. त्यामुळे संशोधन प्रक्रियेस अधिक वाव मिळतो. बौद्धिक संपदा अधिकार असल्यामुळे लेखकांना, संशोधनकर्त्यांना, कलाकारांना आर्थिक लाभ मिळविण्याचे सहज साध्य होते. या हक्काचा वापर करून कोणीही व्यक्ती आपले संशोधन सहजरित्या जगासमोर आणू शकतो. तशी त्याला संधी मिळते. ही या अधिकाराची जमेची बाजू आहे. पेटंट, कॉपीराईट, ट्रेड मार्कच्या माध्यमातून संशोधनकर्त्यांना, लेखकांना सरंक्षण मिळून त्यांच्या बौद्धिक संपदेवर कोणीही अतिक्रमण करू शकत नाही. एकप्रकारे बौद्धिक संपदा हक्क हे निर्मिती करण्याऱ्यांचे कवच-कुंडले आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**संदर्भग्रंथ : -**

१. बारड प्रदीप हिम्मतराव "बौद्धिक संपदा अधिकार: जाणीव - जागृती', अथर्व पब्लिककेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती २०२३, मलपृष्ठावरील मजकुरावरून.

२. गोविलकर वि.म., 'बौद्धिक संपदा अधिकार', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती २०१९, प्रस्तावनेतून.

३. गोविलकर वि.म., कित्ता, मलपृष्ठावरील मजकुरावरून.

४. गोविलकर वि.म., कित्ता, मलपृष्ठावरील मजकुरावरून.